महाराष्ट्र शासन

**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था**

२८, क्वीन्स गार्डन, पुणे-४११००१

दूरध्वनी क्र. ०२०/२६३३३७४३
email id: dydir2.trti@gmail.com

website-
www.trti.maharashtra.gov.in
Email: trti.mah@nic.in


---

जा.क्र.आसंप्रसं/एक्षेविका/मुंउपास/२०२६/ ९८८३ दि. २७ .०४.२०२६

## जाहीर आवाहन

विषय: मुंबई उपनगर जिल्ह्यातील आदिवासी पाड्यांच्या सर्वेक्षण अहवालाच्या मसूद्यावर (Draft Report) नागरिकांचे/संस्थांचे अभिप्राय व सूचना करण्याबाबत विनंती.

या जाहिर आवाहनाद्वारे सर्व नागरीकांना/संस्थांना कळविण्यात येते की, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे द्वारे मुंबई उपनगर जिल्ह्यातील आदिवासी पाड्यांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे व त्यामधील संकलित माहितीच्या आधारे अहवालाचा प्राथमिक मसूदा (Draft Report) तयार करण्यात आला असून तो आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या संकेतस्थळावर पाहण्यासाठी **दि. २७.०४.२०२६ ते दि.०६.०५.२०२६** या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

सदर अहवाल तयार करण्याच्या प्रक्रीयेत पारदर्शकता आणि अचूकता राखण्यासाठी आम्हाला आपले सहकार्य हवे आहे, त्यादृष्टीने आपले अभिप्राय आणि सूचना पाठविण्याची विनंती करण्यात येत आहे.

# अहवालावर अभिप्राय आणि सूचना

* अहवालात नमूद केलेली आकडेवारी आणि नमूद मुद्दे यावर आपले मत कळवावे.
* एखादे विशिष्ट क्षेत्र/पाडा या सर्वेक्षणात समाविष्ट झाला नसेल, तर त्याबाबत सूचना करावी.

# अभिप्राय आणि सूचना कशा पद्धतीने पाठवाव्यात ?

* पत्राद्वारे: आपले अभिप्राय आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, २८, राणीची बाग, कोरेगाव पार्क, पुणे येथे प्रत्यक्ष किंवा टपालाने पाठवता येईल.
* इ-मेलद्वारे: संस्थेच्या एक्षेविका शाखेच्या dydir3.trti@gmail.com या इ-मेल पत्त्यावर.
* अंतिम मुदत: कृपया आपले म्हणणे वरीलपैकी कोणत्याही पद्धतीने **दि.०६.०५.२०२६ पर्यंत** सादर करावे, जेणेकरुन ते विचारात घेणे शक्य होईल. या मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या सूचना/अभिप्राय विचारात घेता येणार नाहीत.

आपल्या सूचनांमुळे हा अहवाल अधिक सर्वसमावेशक आणि धोरण निर्मितीसाठी अधिक उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे.

आयुक्त
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
पुणे.